Maharashtra State
Board Secondary & Higher Secondary Education,
Nashik Divisional Board,Nashik-422 003.

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नाशिक विभागीय मंडळ,नाशिक-422 003.

परिपत्रक क्रमांक/नाविमं/लेखा/कोवीड–१९फी माफी

क्रमांक/नाविमं/लेखा/कोवीड–१९फी माफी /२४४८
नाशिक . ४२२००३
दिनांक : २४ | १२ | २१

प्रति,
**मुख्याध्यापक व प्राचार्य**
मान्यताप्राप्त सर्व संबंधित
शाळा व कनिष्ठ महाविद्यालय

**विषय** – कोवीड –१९ विषाणूच्या प्रादुर्भावामुळे आई व वडील, हयात पालक अथवा कायदेशीर पालक/दत्तक पालक गमावलेल्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करणेबाबत.

**संदर्भ** – राज्य मंडळाचे पत्र क्र.रा.मं/लेखा –६/७०५५ दि २०/१२/२०२१

उपरोक्त विषय व संदर्भिय पत्रास अनुसरून आपणास सुचित करण्यात येते की, महाराष्ट्र राज्यामध्ये कोवीड –१९ विषाणूच्या प्रादुर्भावामुळे काही विद्यार्थ्यांनी त्यांचे आई व वडील, हयात पालक /दत्तक पालक गमावलेले आहेत. अशा विद्यार्थ्यांना आर्थिक परिस्थितीमुळे माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षा व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षेचे परीक्षा शुल्क भरण्यामध्ये अडचणी येवू शकतात. त्यामुळे सदर विद्यार्थी परीक्षा शुल्क भरू न शकल्यामुळे परीक्षेपासून वंचित राहील्यास त्यांच्या शैक्षणीक प्रगतीमध्ये अडथळा येवून पुढील शैक्षणिक वाटचाल खंडीत होण्याची बाब विचारात घेवून शासनाने अशा विद्यार्थ्यांचे सन २०२१–२२ मध्ये आयोजित करण्यात येणा–या परीक्षांचे परीक्षा शुल्क माफ करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्याअनुषंगिक सुचना पुढील प्रमाणे –

१. परीक्षा शुल्क माफीचा सदर लाभ फक्त माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षा व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षा सन २०२२ साठी प्रविष्ठ होणा–या नियमित विद्यार्थ्यांसाठीच देय राहील.
२. मुददा क्रमांक १ मधील ज्या विद्यार्थ्यांनी कोवीड –१९ विषाणूच्या प्रादुर्भावामुळे त्यांचे आई व वडील, हयात पालक /दत्तक पालक गमावलेले आहेत अशा बाधित विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क माफीचा लाभ अनुज्ञेय राहील.
३. उपरोक्तप्रमाणे लाभार्थी विद्यार्थ्यांचे निश्चितीकरण करण्याची जबाबदारी संबंधित शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक/प्राचार्य यांची असून त्यासाठी त्यांना आवश्यक मूळ कागदपत्रे/प्रमाणपत्रे पाहून याबाबत खात्री करणे आवश्यक राहील.
४. (अ) उपरोक्त परीक्षेचे परीक्षा शुल्क विद्यार्थ्यांकडून जमा करून घेतलेले नसल्यास ते शाळा/कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर ते जमा करून घेण्याची आवश्यकता नाही. मात्र शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी अशा विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्क माफीचा प्रस्ताव परिशिष्ठ–अ

व संबंधित साक्षांकित केलेली कागदपत्रे/प्रमाणपत्र यांसह विभागीय मंडळाकडे मंजूरीसाठी सादर करावा.

(ब) अशा विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क प्राप्त करून घेवून ते मंडळाकडे जमा केले नसल्यास शाळा/कनिष्ठ महाविद्यालय स्तरावरूनच ते लाभार्थी विद्यार्थ्यांना त्वरीत परत करण्यात यावे. मात्र शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी अशा विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्क माफीचा प्रस्ताव परिशिष्ठ–ब व संबंधित साक्षांकित केलेली कागदपत्रे/प्रमाणपत्रे यांसह विभागीय मंडळाकडे मंजूरीसाठी सादर करावा.

(क) अशा विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क जमा करून ते मंडळाकडे जमा केले असल्यास अशा लाभार्थी विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्क माफीचा व शुल्क परताव्याचा प्रस्ताव, शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी परिशिष्ठ–क व संबंधित साक्षांकित केलेली कागदपत्रे/प्रमाणपत्रे यांसह विभागीय मंडळाकडे मंजूरीसाठी सादर करावा.

५. कोवीड –१९ विषाणूच्या प्रादुर्भावामुळे संबंधित विद्यार्थ्यांनी त्यांचे आई व वडील, हयात पालक /दत्तक पालक गमावलेले असल्याबाबत संबंधित कागदपत्रांवरून खातरजमा करावी. (उदा. मृत्यू प्रमाणपत्र, उपचारासंदर्भातील किंवा अनुषंगीक कागदपत्रे) संबंधित कागदपत्रांवरून योग्य लाभार्थीचाच प्रस्ताव विभागीय मंडळाकडे पाठविला जाईल याची संबंधित मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी दक्षता घ्यावी.

६. इ. १० वी व इ. १२ वी परीक्षेची ऑनलाईन आवेदनपत्रे भरल्यानंतर विद्यार्थी संख्येनुसार व विषयानुसार परीक्षा शुल्काचे एकत्रित चलन उपलब्ध होते. सदर चलनाच्या आधारे परीक्षा शुल्काची रक्कम मंडळाकडे प्रचलित पध्दतीने जमा केली जाते. ज्या शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांनी उपरोक्तप्रताणे परीक्षा शुल्काची रक्कम मंडळाकडे जमा केलेली नाही त्यांनी मुददा क्र ४ (अ) व (ब) प्रमाणे लाभार्थी विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्क माफीची रक्कम वजावट करून उर्वरित रक्कम मंडळाकडे जमा करावी.

७. सदर योजनेंतर्गत सर्व लाभार्थी विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क माफीचा लाभ उपलब्ध होईल याची दक्षता संबंधित मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी घ्यावी. तसेच सदर लाभापासून कोणताही विद्यार्थी वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी.

उपरोक्त सुचनांचे वाचन करून त्या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करावी.

(राजेंद्र अहिरे)
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्य, व उच्च माध्य. शिक्षण मंडळ,
नाशिक विभागीय मंडळ, नाशिक – 422003

सोबत :–

१) परिशिष्ठ–अ
२) परिशिष्ठ–ब
३) परिशिष्ठ–क

## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,

## ———— विभागीय मंडळ, ————

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा/उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा सन २०२२
कोवीड–१९ विषाणूच्या प्रादुर्भावामुळे आई व वडील, हयात पालक अथवा कायदेशीर पालक/दत्तक पालक गमावलेल्या विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क माफ करणेबाबतचा प्रस्ताव

| | |
|---|---|
| १. शाळा/कमवि.चे नाव :– ............................ | ५. मुख्याध्यापक/प्राचार्य यांचे नांव :– ............................ |
| २. पत्ता :– ............................ | ६. मुख्याध्यापक/प्राचार्य यांचे भ्रमणध्वनी क्रमांक :– ............................ |
| ............................ | ७. शाळा/कमवि.चे दुरध्वनी क्रमांक:– ............................ |
| ३. ईडेक्स नंबर :– ............................ | एसटीडी कोड ............... क्रमांक ............................ |
| ४. युडायस नंबर :– ............................ | |

### परिशिष्ट – अ

(परीक्षा शुल्क विद्यार्थ्यांकडून जमा करून घेतलेले नसल्यास)

(माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा यासाठी स्वतंत्र परिशिष्ट भरावे)

| अ. क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | कोवीड–१९ विषाणूच्या प्रादुर्भावापूर्वी हयात असलेले आई व वडील/पालक/ कायदेशीर पालक/दत्तक पालक यांचे नाव | विद्यार्थ्याशी नाते | कोवीड–१९ विषाणूच्या प्रादुर्भावामुळे गमावलेले आई व वडील/पालक/कायदेशीर पालक/दत्तक पालक यांचे नाव | पुराव्यासाठी ग्राह्य धरण्यात आलेले कागदपत्रे/प्रमाणपत्रे यांचा तपशील (संबंधित कागदपत्रे/प्रमाणपत्रे साक्षांकित करून सोबत जोडावीत) | परीक्षा शुल्क माफीची रक्कम रूपये | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | | | | | | | |
| २ | | | | | | | |
| ३ | | | | | | | |

स्थळ :–

जावक क्रमांक व दिनांक:–

स्वाक्षरी,
मुख्याध्यापक/प्राचार्य

(५)

## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,

### ————विभागीय मंडळ, ————

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा/उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा सन २०२२
कोवीड–१९ विषाणूच्या प्रादुर्भावामुळे आई व वडील, हयात पालक अथवा कायदेशीर पालक/दत्तक पालक गमावलेल्या विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क माफ करणेबाबतचा प्रस्ताव

| | |
|---|---|
| १. शाळा/कमवि.चे नाव :– ........ | ५. मुख्याध्यापक/प्राचार्य यांचे नांव :– ........ |
| २. पत्ता :– ........ | ६. मुख्याध्यापक/प्राचार्य यांचे भ्रमणध्वनी कमांक :– ........ |
| ........ | ७. शाळा/कमवि.चे दुरध्वनी क्रमांक:– ........ |
| ३. ईडेक्स नंबर :– ........ | एसटीडी कोड ........ क्रमांक ........ |
| ४. युडायस नंबर :– ........ | |

## परिशिष्ट – ब

(विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क प्राप्त करून घेवून ते मंडळाकडे जमा केले नसल्यास)
(माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा यासाठी स्वतंत्र परिशिष्ट भरावे)

| अ. क्र. | विद्यार्थ्याचे नाव | कोवीड–१९ विषाणूच्या प्रादुर्भावापूर्वी हयात असलेले आई व वडील/पालक/ कायदेशीर पालक/दत्तक पालक यांचे नाव | विद्यार्थ्याशी नाते | कोवीड–१९ विषाणूच्या प्रादुर्भावामुळे गमावलेले आई व वडील/पालक/कायदेशीर पालक/दत्तक पालक यांचे नाव | पुराव्यासाठी ग्राहय धरण्यात आलेले कागदपत्रे/प्रमाणपत्रे यांचा तपशील (संबंधित कागदपत्रे/प्रमाणपत्रे साक्षांकित करून सोबत जोडावीत) | परीक्षा शुल्क माफीची रक्कम रूपये | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | | | | | | | |
| २ | | | | | | | |
| ३ | | | | | | | |

स्थळ :–
जावक क्रमांक व दिनांक:–

स्वाक्षरी,
मुख्याध्यापक/प्राचार्य

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,

————विभागीय मंडळ, ————

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा/उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा सन २०२२
कोवीड–१९ विषाणूच्या प्रादुर्भावामुळे आई व वडील, हयात पालक अथवा कायदेशीर पालक/दत्तक पालक गमावलेल्या विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क माफ करणेबाबतचा प्रस्ताव

| | |
|---|---|
| १. शाळा/कमवि.चे नाव :– ............ | ७. शाळा/कमवि.चे दुरध्वनी क्रमांक:– ............ |
| २. पत्ता :– ............ | एसटीडी कोड ............ क्रमांक ............ |
| ३. इंडेक्स नंबर :– ............ | ८.परीक्षा शुल्क परताव्यासाठी शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाच्या पगार खात्याव्यतिरिक्त मुख्याध्यापक/प्राचार्य यांच्या पदनामाने असलेल्या अन्य बँक खात्याचा तपशील:– |
| ४. युडायस नंबर:– ............ | १. बँकेचे नाव:– ............ शाखेचे नाव:– ............ |
| ५. मुख्याध्यापक/प्राचार्य यांचे नांव :– ............ | २. खाते क्रमांक:– ............ |
| ६. मुख्याध्यापक/प्राचार्य यांचे भ्रमणध्वनी क्रमांक :– ............ | ३. आयएफएससी कोड:– ............ |

## परिशिष्ट – क

(विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क जमा करून ते मंडळाकडे जमा केले असल्यास)

(माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा यासाठी स्वतंत्र परिशिष्ट भरावे)

| अ. क्र. | विद्यार्थ्याचे नाव | कोवीड–१९ विषाणूच्या प्रादुर्भावापूर्वी हयात असलेले आई व वडील/पालक/ कायदेशीर पालक/दत्तक पालक यांचे नाव | विद्यार्थ्याशी नाते | कोवीड–१९ विषाणूच्या प्रादुर्भावामुळे गमावलेले आई व वडील/पालक/कायदेशीर पालक/दत्तक पालक यांचे नाव | पुराव्यासाठी ग्राह्य धरण्यात आलेले कागदपत्रे/प्रमाणपत्रे यांचा तपशील (संबंधित कागदपत्रे/प्रमाणपत्रे साक्षांकित करून सोबत जोडावीत) | परीक्षा शुल्क माफीची रक्कम रुपये | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | | | | | | | |
| २ | | | | | | | |
| ३ | | | | | | | |

स्थळ :–

जावक क्रमांक व दिनांक:–

स्वाक्षरी,

मुख्याध्यापक/प्राचार्य